# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.06.2024** **वार – मंगळवार**

---

**पदवीप्रदान**

जगभरात बदलत्या काळानुसार उद्योगांच्या गरजाही बदलत आहेत, त्यात कृत्रिम बुध्दिमत्ता आणि मशीन लर्निंगचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारांना मागणी वाढणार आहे, त्यामुळे तरुणांनी हे बदलतं तंत्रज्ञान आत्मसात करणं आवश्यक असल्याचं मत राज्यपाल डॉ. रमेश बैस यांनी आज पुण्यात व्यक्त केलं.

पुण्यातील सिंबायोसिस संस्थेच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या पदवीप्रदान सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी विविध विद्याशाखात प्रावीण्य मिळवलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना राज्यपालांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

**पोर्श कार**

पुण्यातल्या कल्यानईनगर भागात मद्यधुंद अवस्थेत पोर्शे कार चालवून दोघांना चिरडणाऱ्या अल्पवयीन मुलाला जाणीम मंजूर करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या अल्पवयीन मुलाला जामीन मंजूर करत घरी सोडण्याचे आदेश दिले आहेत. पुण्यातील कल्याणी नगर इथं १९ मेच्या पहाटे एका अल्पवयीन मुलाने दोन मोटर सायकलस्वारांना कारने धडक दिली होती. यामध्ये मोटर सायकल स्वारांचा मृत्यू झाला होता.

**ड्रग पार्टी**

पुण्यातील फर्ग्युसन रस्त्यावरील एल 3 हॉटेलमध्ये ड्रग पार्टी झाल्याचे समोर आल्याप्रकरणी पोलीस आणि उत्पादन शुल्क विभाग कारवाई करत असतानाच पुणे महापालिकेनेही फर्ग्युसन रस्त्यावरील अतिक्रमण केलेल्या बार आणि पब्जवर हातोडा उचलला आहे.
आज पुणे महापालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकानं या रस्त्यावरील अतिक्रमण केलेल्या अनेक आस्थापनांवर कारवाई केली.

**उडते पुणे**

पूर्वेचे ऑक्सफर्ड आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या पुण्याची 'उडते पुणे' अशी नव्यानं ओळख होऊ पहात असून ही ओळख पुसण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे, असा सूर पुणे शहरात व्यसनमुक्ती आणि अन्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांनी काढला.
ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्टतर्फे तरूण पिढीला व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'संयम' या उपक्रमांतर्गत आज ‘पुणेः शिक्षणाचे माहेरघर की व्यसनांचे आगार?’ या विषयावर एका विशेष परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं

**हार्दिकर**

गरिबीला प्रतिष्ठा देणारी राजकीय व्यवस्था वाईट आहे , अशा शब्दात जेष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते विनय हर्डीकर यांनी सोमवारी व्यवस्थेवर टीका केली.

साधना साप्ताहिक, साधना प्रकाशन आणि विनय हर्डीकर अमृतमहोत्सव समिती यांच्या वतीने  पत्रकार आनंद आगाशे यांनी हर्डीकर यांची मुलाखत घेतली . साधना चे संपादक विनोद शिरसाठ उपस्थित होते.

**उषा प्रभा**

अनेकांनी गिर्यारोहणाचे वार्ताकन केले परंतु हिमालय आणि गिर्यारोहणा बाबत मानवी नाट्यातील नात्याच्या अनुषंगाने जेवढ्या प्रमाणात लिखाण व्हायला हवे, तेवढे जाहले नाही. गिर्यारोहणा संदर्भात विपुल मराठी साहित्य निर्माण व्हावी, अशी अपेक्षा गिरीप्रेमी संस्थेच्या अध्यक्ष  पागे यांनी व्यक्त केली.

राजहंस प्रकाशन तर्फे प्रकाशित आणि मृणालिनी चितळे लिखित ज्याच त्याच एव्हरेस्ट या कादंबरीचे प्रकाशन रविवारी एस एम जोशी सभागृहात झाले. त्या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून पागे बोलत होत्या.

**फिरता दवाखान**

'रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड'तर्फे  भारती विद्यापीठ  आयुर्वेदिक कॉलेज आणि रुग्णालय यांना सुसज्ज फिरता दवाखाना हस्तांतरित करण्यात आला. हा दवाखाना वेल्हे या ग्रामीण विभागामध्ये कार्यरत असेल. या फिरत्या दवाखान्यामध्ये ई.सी.जी., ए.ई.डी., नेत्र तपासणी, ऑक्सिजन सिलेंडर आणि इतर सुविधा आहेत.

**प्रबोधन पर्व**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्वचे  आयोजन आज आणि उद्या करण्यात आले आहे. या पर्वात १० वी १२ वी च्या विध्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन , शिवकालीन शस्त्र प्रदर्शन,प्रात्यक्षिक, मर्दानी खेळ, शाहीरी तसेच लोककलेचे कार्यक्रम आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचा मागोवा घेणा-या नाट्य, नृत्य आणि संवादाच्या भव्य कार्यक्रमांचा समावेश आहे. नागरिकांनी या प्रबोधन पर्वात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त राहुल महिवाल यांनी केले.

**शेती निविष्ठा**

शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा जीएसटीमुक्त करण्याची गरज असून, शासनाने यावर त्वरीत निर्णय घ्यावा, अशी मागणी राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक गणेश सांगळे आणि खडकवासला कालवा संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष विजय गावडे यांनी केली आहे. सध्या शेतीला लागणारी खते-औषधे, बियाणे यांसारख्या निविष्ठांवर १८ टक्क्यांपर्यंत जीएसटी आकारला जात आहे. हा जीएसटी कर थेट शेतकऱ्यांच्या खिशातून जात आहे.

**मनपा आयुक्त**

पुणे महापालिकेचे मुख्य खाते आणि क्षेत्रीय कार्यालयात समन्वय राखण्यासाठी सहायक आयुक्तांना जादा अधिकार देण्याचा निर्णय महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी घेतला आहे. महापालिका सहायक आयुक्त यांना त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. पुणे महापालिकेचे भौगोलिक कार्यक्षेत्र हे ५ परिमंडळ उपआयुक्त कार्यालय आणि १५ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयामध्ये विभागले गेले आहेत. यामध्ये मुख्य खते आणि क्षेत्रीय कार्यालयांमध्ये समन्वय असणे गरजेचे असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

**कृषि आयुक्त**

पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांची कृषी आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. राज्यात नोकर भरतीमध्ये घोटाळे होत असताना पुणे महापालिकेत बिनवडे यांनी सुमारे ८०० जागांची पारदर्शक भरती करून दाखवली.

**<u>रेल्वे विभाग</u>**

पुणे रेल्वे विभागातील घोरपडीतील डिझेल लोको शेडमध्ये सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक राम करण यादव यांच्या हस्ते या प्रकल्पाच उद्घाटन करण्यात आल. डिझेल लोको शेडच्या छतावर एकूण १ हजार १८८ सौर पॅनेल बसविण्यात आले आहेत. या प्रकल्पातून वर्षाला अंदाजे ९.४४ लाख किलोवॅट वीजनिर्मिती होणार असून रेल्वेच्या वीज देयकात ५२ लाख रुपयांची बचत होईल. याचबरोबर कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन प्रतिवर्ष १८ हजार १२२ टनांनी कमी होण्यास मदत होईल.

**<u>झिका विषाणू</u>**

पुणे शहरात यावर्षी प्रथमच झिका विषाणूचे दोन रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे आरोग्य विभागाच्या तज्ज्ञांनी बाधित परिसराला भेट देऊन उपाययोजना सुरू केल्या आहेत. सध्या दोघांची प्रकृती स्थिर आहे. महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी ताप असलेल्या नागरिकांना जवळच्या पीएमसी रुग्णालयांना भेट देऊन झिका विषाणू संसर्गाची तपासणी करण्याचे आवाहन केले.

**<u>लष्कर इमारत</u>**

ब्रिटीशकालीन लष्कर न्यायालयाची इमारत जुनी झाल्यानं तसंच ती जागा अपुरी पडत असल्यानं  लष्कर न्यायालयाचं स्थलांतर वानवडीतील पुणे महापालिकेच्या महात्मा फुले सांस्कृतिक भवनाच्या आवारात करण्यात येणार आहे. गुरुवारपासून महात्मा फुले सांस्कृतिक भवनच्या वास्तूत लष्कर न्यायालयाचे कामकाज सुरू होणार आहे. हे स्थलांतर तात्पुरत्या स्वरूपाचे आहे.

**<u>टेटे</u>**

एकम टेबल टेनिस अकादमीतर्फे तिसरी जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धा पार पडली.
स्पर्धेतील पंधरा वर्षाखालील मुलांच्या गटात निषाद लेले मुलींच्या  गटात सई कुलकर्णी, मुलांच्या तेरा वर्षाखालील खालील गटात मोहील ठाकूर तर अकरा वर्षाखालील  गटात नक्ष महाजन विजेते ठरले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश अंशत: ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

## हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.